# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी
**बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ / पौष ७, १९४४ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उच्च व तंत्रशिक्षण,वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**<br>**(३) उद्योग मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

**अहमदनगर जिल्हयात शिक्षकांच्या पदांना मान्यता देऊन बनावट आदेश काढल्याबाबत**

**(१) * ४९४४४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शिक्षक भरती सन २०१२ पासून बंद असताना तसेच टीईटी परीक्षा उतीर्ण झाल्याशिवाय शिक्षक भरती करता येत नसताना अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, नगर शहर, राहुरी व राहता तालुक्यातील चार शिक्षक संस्थेतील ३५ शिक्षकांना शासनाचे बनावट आदेश काढून अनुदानित तत्वावर मान्यता दिल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट आदेशाच्या आधारे कोटयवधी रुपयाच्या फरकाची रक्कम काढून अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे गैरव्यवहार करणाऱ्या संस्था चालक, अधिकारी/कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. अहमदनगर यांनी प्राप्त पत्रानुसार ३४ पदांना मान्यता दिलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांच्या निर्देशानुसार हिंदसेवा मंडळ, अहमदनगर संचलित माध्यमिक विद्यालय, अकोले येथील १४ शिक्षकांच्या सुनावण्या घेऊन त्यापैकी ९ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता अयोग्य असल्याने त्या रद्द करुन त्यांचे वेतन बंद करण्यात आले आहे. सदर प्रकरणी उपरोक्त प्रमाणे वैयक्तिक मान्यता देणाऱ्या तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. अहमदनगर यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (२) (बी) (दोन) नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांनी विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास नुकताच सादर केला असून प्रस्ताव तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील इंग्रज कालीन अजनी पुलाची झालेली दुरवस्था

**(२) * ५०८३० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील इंग्रज काळातील अजनी रेल्वे पुलाचा कालावधी संपला असूनसुद्धा यावरून अद्यापही वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जीर्ण पुलावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अजनी पुल नव्याने बांधण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

अजनी पुल सन १९२३ मध्ये बांधण्यात आला आहे. मध्य रेल्वेने दि.१५.०७.२०१९ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस कळविल्याप्रमाणे विश्वेश्वरैय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर यांनी या पुलाच्या अंतरिम रचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) अहवालानुसार दि.०७.१२.२०१९ पासून सदर पूल जड वाहनांच्या वाहतूकीस बंद केला आहे. या पुलावरुन केवळ हलक्या वाहनांची वाहतूक सुरू आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) अजनी पूल हा प्रकल्प महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून दि.०१.११.२०२२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रचर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.यांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. निधी उपलब्धता होण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर विकास विभाग यांना विनंती करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनंतर काम सुरु करण्यात येणार आहे असे महारेल यांनी कळविले आहे.

-----------------

## महाड तालुक्यातील (जि.रायगड) साकव बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(३) * ५०६३६ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेत गत पाच वर्षात मंजूर झालेल्या साकवांच्या बांधकामात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराची चौकशी करून यातील दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्याबाबतचा अहवाल सामाजिक न्याय विभागास सादर करावा असे आदेश सामाजिक न्याय विभाग, अलिबाग (जि.रायगड) यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांना दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) व (४) सदर कामांची पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत अधिक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविण्यात आले आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) रस्त्याच्या बांधकामात झालेली अनियमितता

**(४) * ५०९४४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सन २०१७ ते २०२२ या पाच वर्षाच्या कालावधीत रुपये १५ कोटीपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यात आली असून या कामात अनियमितता झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उदभवत नाही
(३) प्रश्न उदभवत नाही

-----------------

## श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सोयी सुविधांबाबत

**(५) * ४९७३४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपूर (जिल्हा अहमदनगर) येथील १२०० एकरवरील एमआयडीसीमध्ये अनेक पायाभूत सुविधांचा अभाव असून येथे अद्यापही सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची उभारणी झालेली नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीरामपूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हद्दीत काही बाहेरील उद्योगांचे घातक रसायन व घन कचरा देखील बेकायदेशीररित्या आणून टाकला जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

श्रीरामपूर औद्योगिक क्षेत्रात म.औ.वि. महामंडळामार्फत आवश्यक पायाभूत सुविधा (रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा इ.) पुरविण्यात आल्या आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रात मुख्यत: अभियांत्रिकी व तत्सम औद्योगिक सांडपाणी निर्माण न होणारे उद्योग असल्याने सदर ठिकाणी सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर ठिकाणी सांडपाणी केंद्राची उभारणी करण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्वच राज्यमार्ग व जिल्हा मार्गाची झालेली दुरवस्था

**(६) * ५०३१९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वत्र राज्य मार्ग व जिल्हा मार्गावरील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून रस्त्यांवर मोठया प्रमाणावर खड्डे पडलेले असून वाहतूकीसाठी हे रस्ते अत्यंत धोकादायक झाल्याने अपघात होऊन अनेक नागरिकांचे यात मृत्यु व काहींना कायमचे अपंगत्व आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते बांधताना किंवा त्याचे डांबरीकरण करताना रस्त्याचा दर्जा व जास्तीत जास्त कालावधीसाठी सुस्थितीत राहण्यासाठी तसेच राज्यातील पर्जन्य स्थितीला पूरक असण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मापदंड व मानकांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक असताना कंत्राटदार व अधिकारी यांच्याकडून अनेक ठिकाणी रस्त्यांच्या बांधकामाचा योग्य तो दर्जा राखला जात नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ट बांधकामामुळे त्यावरील खर्च वाया जातो व अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळे जीवितहानी देखील होत असून कोटयवधी रुपयांचा खर्च पुन्हा दुरुस्तीसाठी करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील राज्य व जिल्हा मार्गावरील खड्डे माहे नोव्हेंबर,२०२२ अखेर दुरुस्तीसाठी सुमारे ५०० कोटी रुपये खर्च करुनही रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

गृह विभागाच्या प्राप्त अहवालानुसार सर्वसाधारणपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे वाहन चालविणे. अतिवेगाने वाहन चालविणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे, ही कारणे बुहुतांशी अपघातास कारणीभुत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषत: ओव्हर स्पीडींगमुळे जास्त प्रमाणात अपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) रस्त्यांची बांधणी तसेच दुरुस्ती करतांना शासनाने विनिर्देशित केलेल्या मापदंडानुसार कामे गुणवत्तापूर्वक करण्यात येतात.
(४) रस्त्यांवरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ते वाहतूकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानोरा (जि.नंदुरबार) येथील रंका नदीवरील क्षतीग्रस्त झालेल्या पुलाबाबत

**(७) * ५४७६८ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा (जि.नंदुरबार) येथील रंका नदीवरील पुलाचे चारही पिलर नदीत कोसळल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे नव्याने बांधकाम न झाल्यामुळे आंतरराज्य वाहतूकीस अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करुन नवीन पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर पुल क्षतीग्रस्त झाला हे खरे आहे.
(२) व (३) सदर ठिकाणी नवीन पुल बांधण्याचे मंजुर काम मे, २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

----------------------

## राज्यात ऑक्सीटॉसीन औषधाची विनापरवाना निर्मिती व पुरवठा होत असल्याबाबत

**(८) * ५३३५९ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गायी, म्हशींचे दुध वाढविण्यासाठी मानवी शरीराला हानीकारक असणाऱ्या ऑक्सीटॉसीन औषधाचा वापर करण्यासाठी औषध निर्मिती व पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच पुणे येथे गायी, म्हशींचे दुध वाढविण्यासाठी ऑक्सीटॉसीन औषध निर्मिती व वितरण करणाऱ्या टोळीवर छापा टाकून कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याचा मानवी शरीरावर घातक परिणाम होऊन अशक्तपणा, दृष्टीविकार, पोटाचे आजार, नवजात बालकांना काविळ, गर्भवती महिलेस रक्तस्त्राव, श्वसन व त्वचेचे विकार असे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुध वाढीसाठी अशा धोकादायक औषधांची निर्मिती व वितरण करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. संजय राठोड :** (१) व (२) हे खरे आहे.

पुणे येथे विनापरवाना ऑक्सीटॉसीन इंजेक्शन निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर संयुक्तपणे (पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन) धाड टाकण्यात आली आहे आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(३) होय, दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीसांचे अंमली पदार्थविरोधी पथक-१ गुन्हे शाखा पुणे शहर व अन्न व औषध प्रशासन पुणे यांनी संयुक्तरीत्या कलवड वस्ती, लोहगांव पुणे या ठिकाणी दि. ०५/११/२०२२ रोजी ऑक्सीटॉसीन इंजेक्शन या औषधाची विना परवाना उत्पादन व विक्रि करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकली. सदर धाडीमध्ये श्री समीर अन्वर कुरेशी व इतर ४ व्यक्ती ऑक्सीटॉसीन इंजेक्शन चे विनापरवाना उत्पादन करीत असल्याचे आढळून आले.

या धाडीत औषध निरीक्षक पुणे यांनी ऑक्सीटॉसीन इंजेक्शन व सदर इंजेक्शन बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल यांचे एकूण ८ नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेतले. सदर नमुने उच्च प्राधान्याने चाचणी व विश्लेषणार्थ अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत त्यापैकी ४ नमुन्यांचा चाचणी अहवाल प्राप्त झाला असून, सदर औषधामध्ये ऑक्सीटॉसीन हे घटकद्रव्य असल्याचे आढळून आहे आहे.

या प्रकरणी पोलिसांनी सदर जागेतून एकूण ५३,८२,२५०/- किंमतीचा ऑक्सीटॉसीन इंजेक्शनचा तयार माल व त्यासाठी लागणारा कच्चा माल, पॅकींग साहित्ये व इतर सामुग्री जप्त केली आहे. औषध निरीक्षक पुणे यांनी विमाननगर पोलिस स्टेशन पुणे येथे एकूण ०५ आरोपींविरुध्द एफ.आय.आर. नं-०४२१/२०२२ दि.६/११/२०२२ नोंदवला असून, पोलिसांनी सदर कारवाईमध्ये एकूण १२ आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास पोलिसांमार्फत चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कामांवरील स्थगिती उठविण्याबाबत

**(९) * ५४९९० श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण व संगमेश्वर तालुक्यात गत ३ वर्षात तिवरे धरण फुटणे, वादळ व अतिवृष्टी या कारणांस्तव रस्त्यांची व पुलांची मोठ्या प्रमाणात हानी झाली असल्याने या पुलांच्या व रस्त्यांच्या पुनर्बांधणीच्या कामांना माहे डिसेंबर, २०२१ व मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पांतर्गत मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या कामांना स्थगिती दिली असून रत्नागिरी (उत्तर विभाग) येथील कामांवरील स्थगिती उठविण्यात आली मात्र चिपळूण येथील कामांवर अद्यापही स्थगिती कायम ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात रस्ते, पुलाची कामे पुर्ण झाली असली तरी अद्याप कंत्राटदारांना त्यांची देयके न दिल्यामुळे कंत्राटदारांनी काम करण्यास नकार दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चिपळूण येथील कामांवरील स्थगिती उठवून ठेकेदारांना पूर्ण झालेल्या कामाची देयके देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) सा.बां.विभागाने दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये स्थगित केलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन सर्व नविन इमारती बांधणे, इमारतीची देखभाल व दुरुस्तीची कामे, धुपप्रतीबंधक बंधारे, घाट रस्ते, नविन पुल व पुलांची दुरुस्ती, रेल्वे उड्डाणपूल तसेच काही रस्त्यांचे डांबरीकरण, मजबुतीकरण व दुरुस्तीची कामे या वरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

स्थगित केलेल्या उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(३) याबाबत स्थानिक कंत्राटदार यांचे निवेदन प्राप्त आहे.

(४) अदयापही स्थगित असलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

अर्थसंकल्पीय तरतूदीतून वितरणासाठी उपलब्ध निधीतून प्रमाणशिर पध्दतीने निधी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) येथील कोलंबी फाटा ते नायगावाला जोडणा-यां रस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१०) * ५३०९४ श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) येथील कोलंबी फाटा ते नायगावला जोडणा-या २० कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदराने निकृष्ट दर्जाचे केल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागातील अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या संगनमताने सदरील काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) कोलंबी फाटा ते नायगाव हा रस्ता प्रजिमा दर्जाचा आहे. सदर रस्त्यावर १५ कि.मी. लांबीत डांबरीकरण व मजबुतीकरणाच्या मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दि.१३.०६.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामाची ६०% भौतिक प्रगती साध्य करण्यात आली आहे. सदरचे काम जून, २०२३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलडाणा-अजिंठा या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(११) * ५३४१० श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाताळा पाडळी गिरडा फाटा चौथा जामठी धाड या मार्गावरील बुलडाणा-अजिंठा या राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम सुरु असून या रस्त्याच्या बांधकामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाच्या अवजड वाहतूकीमुळे रस्त्याची दुरवस्था होऊन अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराच्या चुकीमुळे दुरवस्था झालेल्या सदर प्रमुख जिल्हा मार्ग २१ या रस्त्याची दुरुस्ती कंत्राटदाराकडून करण्याबाबतचे पत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांनी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग, धुळे यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या कंत्राटदाराकडून सदर रस्त्याची व रस्त्यावरील पुलांची कामे करून घेण्याची मागणी अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, पुणे तसेच कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग, धुळे यांना दिनांक २७ सप्टेंबर,२०२२ व दिनांक ०७ मार्च, २०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्र देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) बुलडाणा- अजिंठा राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजाची वाहतूक या रस्त्यावरुन झालेली असल्यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली आहे. पोलीस अहवालानुसार सदर रस्त्यावर अपघात झाल्याचे निदर्शनास येत नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्रजिमा २१ या रस्त्याची सुधारणा करणेचे मंजूर कामाची नविदा प्रक्रीया पूर्ण करून काम कार्यान्वीत करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयांमध्ये शिल्लक धानाची विक्री केल्याने झालेले नुकसान

**(१२) * ५४४९७ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळात सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या हंगामात धान खरेदीमध्ये मोठया प्रमाणात धानाची आवक वाढलेली असून खरेदी केंद्रावर दिवसाला १००० ते ६००० क्विंटल पर्यंत धान येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा, गडचिरोली आणि जव्हार येथील प्रादेशिक कार्यालयात धानाची भरडाई वेळेत न झाल्यामुळे त्यात घट येऊन आलेल्या घटीमुळे अनुक्रमे १४.८९ कोटी, ४.५१ कोटी आणि १४.६३ कोटी इतक्या रकमेचा तोटा महामंडळास झाल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धानाची भरडाई वेळेत न होणे, व्यापारी खरेदी होणे, धानाची साठवणूक शास्त्रीय पद्धतीने न करणे, शिल्लक धानाचा लिलाव वेळेत न करणे इत्यादी कारणामुळे महामंडळाला होत असलेला तोटा कमी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या हंगामात धानाची आवक जास्त असल्याने काही खरेदी केंद्रांवर ८०० ते १००० क्विंटल पर्यंत खरेदी झालेली आहे.
(२) खरेदी पैकी शिल्लक असलेल्या धानाची ई-लिलावाद्वारे विक्रीची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच घट/तुटीबाबतची आकडेवारी अंतिम होईल.
(३) व (४) घट व विक्रीतून होणारा तोटा कमी होण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त राईस मिलर्स नियुक्त करण्याचा प्रयत्न संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली करण्यात येते. तसेच संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत गोदामे बांधकामासाठी गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात जागा उपलब्ध करुन घेतली असून गडचिरोली जिल्ह्यात ९ गोदामे बांधण्यात आलेली असून, एकूण १.९८ लक्ष क्विंटल क्षमता आहे. प्रादेशिक कार्यालय, जव्हार अंतर्गत भाडे तत्वावर गोदामे घेऊन १००% धान साठा गोदामात साठविण्यात येतो.

खुल्या जागेत साठविण्यात आलेल्या धानाच्या सुरक्षितेसाठी ताडपत्र्या खरेदी करुन खरेदी केंद्रांना उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था स्तरावर पक्के ओटे व शेड बांधण्यात आलेले असून काही ठिकाणी कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान देऊन त्रुटींची पूर्तता केलेल्या शाळांना निधीची तरतूद करण्याबाबत

**(१३) * ४९७७२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १६ जुलै, २००९ व दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ च्या निर्णयाद्वारे कायम विनाअनुदान धोरण रद्द ठरवत अशा शाळांना टप्पा पध्दतीने वेतन अनुदान देण्याचे मान्य केले होते, परंतु दिनांक १९ सप्टेंबर,२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे पुढील आदेशापर्यंत सरसरकटचे धोरण आणल्यामुळे दरवर्षी २० टक्के प्रमाणे होणारी टप्पावाढ थांबली गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी, अंशत: अनुदानित २० आणि ४० टक्के अनुदान घेणाऱ्या शाळा तसेच त्रुटींची पुर्तता केलेल्या अघोषित सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना "सरसकट" हा शब्द काढून टाकून पुर्वीच्या नियमानुसार १०० टक्के अनुदान मिळण्याबाबत तसेच विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना सेवासंरक्षण आणि अनुदान देण्यात यावे या मागण्यांसाठी शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ पासून मुंबई येथील आझाद मैदानात महाआक्रोश आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संघटनांनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.शालेय शिक्षण मंत्री यांना भेटीद्वारे निवेदन देवूनही त्याची कोणतीही दखल शासनस्तरावरुन घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे

(३) हे खरे नाही. त्रुटी पुर्ततेवरील शाळांना तसेच अघोषित शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे शिक्षकांनी आंदोलन थांबवावे असे आवाहन यानुषंगाने आयोजित बैठकांमध्ये मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांनी केले आहे.

(४) मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांना २० टक्के व ४० टक्के तसेच, अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा वर्ग/तुकडयांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा तसेच, यापूर्वी २० टक्के व ४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी-जिंतुर महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१४) * ५०१९४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-जिंतुर या ४१ किलोमिटर महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने काम पूर्ण होण्याआधीच परभणी तालुक्यातील धर्मापुर परिसरात महामार्गाला जागो-जागी भेगा पडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
मात्र, सदर महामार्गावर काही ठिकाणी किरकोळ स्वरुपाच्या काँक्रीटीकीकरणास भेगा पडल्याचे दिसून येत आहे. सदर भेगा या Shrinkage cracks असण्याची शक्यता आहे. तरीही सुरक्षितता म्हणून कंत्राटदाराच्या देयकातून रुपये २ कोटी इतकी रक्कम राखून ठेवलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काच्या अधिनियमाचे पालन होण्याबाबत**

**(१५) * ५३१२७ श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण हक्क कायदा, २००९ च्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्य शासनाची असताना शासन निर्णय क्रमांक २११६/ प्र. क्र. २०/ एस. एम. २ दिनांक ०२/०३/२०१७ नुसार सीमावर्ती भागातील तसेच बृहत आराखड्यातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा व गरजेनुसार द्यावयाच्या उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळांना खाजगी शैक्षणिक संस्था मार्फत संचलित करावयाच्या कार्यवाहीचे शासनाचे सर्व आदेश प्रक्रिया व प्रस्ताव रद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील २५९ ठिकाणची मुले शाळाबाह्य होणार असून यामुळे शिक्षण कायद्याच्या तरतूदीचा भंग होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काच्या अधिनियमाचे पालन होण्यासाठी राज्य शासनाच्या बृहत आराखडयाबाबत आदेश प्रक्रिया व प्रस्ताव रद्द करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ हा प्राथमिक शिक्षणाकरीता आहे. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ हा दिनांक १९.०१.२०१३ पासुन राज्यात लागु करण्यात आल्यामुळे मराठी माध्यमिक शाळांबाबत तयार करण्यात आलेला बृहत आराखडा धोरण, गरजेनुसार परवानगी द्यावयाच्या उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळांबाबतचे धोरण तसेच सीमावर्ती भागातील मराठी माध्यमिक शाळांबाबतचे धोरण इत्यादीच्या अनुषंगाने मागविण्यात आलेले सर्व प्रस्ताव, या संदर्भातील सर्व आदेश व शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

**राज्यात विशेषत: ठाणे, पालघर व गोंदिया येथे महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ**

## व पणन महामंडळामार्फत धान खरेदी करताना झालेला गैरव्यवहार

**(१६) * ५०५४५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: ठाणे, पालघर व गोंदिया जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ व पणन महामंडळामार्फत धान (भात) खरेदी योजना हंगाम २०२०-२०२१ आणि २०२१-२०२२ मध्ये संगनमताने धानाची प्रत्यक्ष खरेदी न करता कागदोपत्री खरेदी केल्याचे दाखवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानाची अवाजवी घट दर्शविणे तसेच शेतक-यांना भ्रमणध्वनीव्दारे खरेदी आणि पेमेंटची माहिती देणे बंधनकारक असताना शेतक-यांऐवजी अन्य व्यक्तींच्या भ्रमणध्वनींची नोंद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी होण्याची आवश्यकता असतानाही या प्रकरणी विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

राज्यात मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ या दोन अभिकर्ता संस्थांमार्फत NeML या संस्थेच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे धान खरेदी करण्यात येते. आधारभूत किंमतीने धान खरेदीसाठी शेतकऱ्यांचे ऑनलाईन पध्दतीने रजिस्ट्रेशन केले जाते. त्यासाठी शेतकऱ्यांचे आधार कार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा इत्यादी कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच रजिस्ट्रेशन केले जाते. यामध्ये शेतकऱ्यांचा पीक पेरा महसूल विभागाच्या ऑनलाईन पोर्टलवरून घेण्यात येतो. तद्नंतर रजिस्ट्रेशन केलेल्या शेतकऱ्यांचे शेड्यूलींग करुन धानाची खरेदी केली जाते.

तसेच खरेदी केलेल्या धानाचे चुकारे ऑनलाईन/पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे अदा करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून १ टक्के घट/तूट अनुज्ञेय आहे.

मार्केटींग फेडरेशन :- कोणत्याही प्रकारची अवाजवी घट दर्शविण्यात आली नसून धान उचल करण्यास झालेल्या विलंबामुळे साठवणुकीदरम्यान प्रत्यक्ष झालेली धान घट दर्शविण्यात आली आहे.

आदिवासी विकास महामंडळ :- पणन हंगाम २०२०-२१ मध्ये विलंबाने भरडाई झाल्याने गोंदिया जिल्ह्यामधील शिल्लक धानाची ई-लिलावाद्वारे विक्रीची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर घट/तुटीचा अहवाल प्राप्त होईल.

उपअभिकर्ता संस्थांमार्फत धान खरेदी केंद्रांवर शेतकरी नोंदणीच्या वेळी शेतकऱ्यांनी दिलेल्या ७/१२ उतारा, बँक खात्याचा तपशील व भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादीनुसार शेतकऱ्यांची ऑनलाईन पोर्टल नोंदणी करण्यात येते व शेतकऱ्यांनी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकानुसारच शेतकऱ्यांना धान खरेदी संदर्भातील संदेश देण्यात येतात व शेतकऱ्यांचे चुकारे ऑनलाईन/पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे अदा करण्यात येते.

(३) व (४) विभागाच्या दि.१९.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार धान खरेदी दरम्यान होणाऱ्या सर्व अनियमिततेबाबतची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्ता संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार दोषी असलेल्या उप अभिकर्ता संस्थांवर अभिकर्ता संस्थांमार्फत कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-------------

**मे. कन्सेप्टट्रानर व अपोलो फार्मसी या दोन कंपन्यांनी रक्तदाब मोजण्याच्या उपकरणाचे विनापरवाना चाचणी न करता बेकायदेशिररित्या उत्पादन केल्याबाबत**

**(१७) * ५२१६९ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी येथील मे.कन्सेप्टट्रानर प्रा. लि. आणि अपोलो फार्मसी या दोन कंपन्यांवर अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकली असता रक्तदाब मोजणाऱ्या उपकरणाचे विनापरवाना उत्पादन व विक्री केल्याप्रकरणी सुमारे १० लाख ३५ हजार रुपये किंमतीचा उपकरणाचा साठा जप्त करुन कंपनी विरोधात गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १४ मे,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्ही कंपन्यांनी विनापरवाना व गुणवत्ता चाचणी न करता लाखो रुपये किंमतीची उपकरणे बेकायदा विक्री केल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी दोन्ही संस्थांविरुध्द भा. दं. वि. च्या कलम ४२० व ३४ सहवाचन औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०, कलम १८ (क) तसेच मेडीकल डिव्हायसेस नियम २०१७ चे उल्लंघन केल्याने गोवंडी पोलीस स्टेशन येथे पुढील तपास चौकशीसाठी दि. ०४/०५/२०२२ रोजी प्रथम खबर अहवाल (F.I.R.) क्र. ०१९९/२०२२ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलिसांसमवेत पुढील तपास सुरु आहे. तपासणीची कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदयाअंतर्गत मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात शालेय पोषण आहार योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(१८) * ५०२९४ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.बबनराव शिंदे (माढा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची गळती कमी होऊन उपस्थिती वाढावी व त्यांना सकस आहार मिळावा म्हणून मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत शाळांना तांदूळ आणि इतर धान्ये पुरविण्यात येतात, मात्र त्यासाठी लागणारे इंधन, भाजीपाला, खाद्यतेलाचे अनुदान तसेच स्वयंपाकी व मदतनीस यांचे मानधन गत अनेक महिन्यापासून थकीत आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी करण्यात आलेली तरतूद तुटपुंजी असून या रकमेत वाढ करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, थकीत अनुदानामुळे हा खर्च शिक्षक व मुख्याध्यापकांना स्वत:च्या पगारातून करावा लागत असल्यामुळे अनेक संघटनांनी याबाबत शासनाकडे आक्षेप नोंदविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकीत अनुदान व मानधन अदा करुन अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रस्तुत योजनेंतर्गत राज्यातील अकोला जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांना तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच, स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे ऑक्टोंबर, २०२२ अखेरपर्यंत मानधन अदा करण्यात आले आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत खाद्यतेलाचे अनुदान जिल्ह्यांना वितरीत करण्यात आले आहे. इंधन व भाजीपाल्याचे अनुदान तांत्रिक अडचणींमुळे माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीचे ७० टक्के अनुदान वितरीत करण्यात आले आहे व उर्वरित अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर अनुदान वितरण करण्यात आले आहे. स्वयंपाकी व मदतनीस यांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगाव-जालना (जि.जालना) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(१९) * ५५४६७ डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव-जालना (जि.जालना) रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे तेथे अपघातांचे प्रमाण वाढून १७ व्यक्तींचा मृत्यु झाला असून २० व्यक्ती कायमच्या अपंग झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांवर खड्डे पडून रस्त्याला तडे गेल्यामुळे वाहन चालकांना व प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
तडे अथवा खड्डे झाल्याने प्रवाशांना गैरसोय होईल असा कुठलाही भाग बांधकाम पुर्ण झालेल्या भागात नाही.
(३) सदरील लांबीत काम करण्याची प्रलंबित परवानगी वन विभागाकडून नुकतीच दिनांक ०७.१२.२०२२ रोजी प्राप्त झाली असून, सद्यस्थितीत या १.४०० कि.मी लांबीतील रस्त्याचे काम प्रगतीत आहे. तसेच उर्वरीत पूर्ण झालेल्या लांबीत रस्त्याला गेलेल्या तड्यांची कंत्राटदारामार्फत मानकाप्रमाणे देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्यात येत आहे.

(४) वन विभागाची परवानगी प्राप्त नसल्याने काम पूर्ण करता आले नाही.

-----------------

**नवी मुंबई येथील दोन कंपन्यांमधून भेसळयुक्त अन्नपदार्थ जप्त केल्याबाबत**

**(२०) * ५२७४२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापे, नवी मुंबई येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील मेसर्स वेदिक स्पाईस प्रा.लि या कंपनीमधून अन्न व औषध प्रशासन विभागाने हजारो किलो भेसळयुक्त हळद पावडर, धनिया पावडर, मिरची पावडर, जीरे पावडर, करी पावडर असा एकुण २७ लाख ३९ हजार रूपये किंमतीचा माल जप्त केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) ठाणे विभागाने नवी मुंबईतील खैरणे औद्योगिक क्षेत्रातील पी एम गोल्ड स्टोरेज या शीतगृहातून अस्वच्छ वातावरणात कमी प्रतीचा अन्नपदार्थ असल्याच्या संशयातून लाखो रुपयांचा खजूर आणि हजारो किलोचे जिरे असा एकुण एक कोटी सात लाख रुपयांचा साठा दिनांक १४ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास जप्त केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भेसळयुक्त अन्नपदार्थांवर आळा घालण्यासाठी तसेच संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) खरे आहे.

(३) यासंदर्भात चौकशी केली असून सदर दोन्ही प्रकरणात एकूण १८ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आलेले असून त्यांचे अहवाल प्रतिक्षाधीन आहेत. अन्न विश्लेषक यांचेकडून अहवाल प्राप्त झाले नंतर सदर विश्लेषण अहवालासह संबंधित आस्थापनेच्या तपासणी अहवालात आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार कार्यवाही घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती शहरात रेशनच्या तांदळाचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(२१) * ५५१२० श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात दारिद्रय रेषेखालील कार्डधारक व अंत्योदय लाभार्थी यांना रेशनवर दोन ते तीन रुपयांना मिळणारा तांदूळ व्यापाऱ्यांना १५ ते २० रुपये दराने विकत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे दररोज ५० ते १०० क्विंटल रेशनच्या तांदळाची काळया बाजारात विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील तांदूळ विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अमरावती शहरात सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत कार्डधारकांना धान्य वितरीत करताना मशीनवर अंगठा घेवूनच वितरीत करण्यात येते. मागील वर्षभरात अमरावती जिल्हयामध्ये ई-पॉस मशीनद्वारे कार्डधारकांना धान्य वितरण करण्याची टक्केवारी सरासरी ९५ % पेक्षा अधिक आहे.

अवैधरित्या तांदूळ विक्री रोखण्यासाठी अमरावती शहरात दरमहा रास्त भाव दुकानाच्या तपासण्या जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत करण्यात येतात. त्याचप्रमाणे, अवैधरित्या धान्याची विक्री करताना आढळल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयाकडून नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उंबरठाण ते गुजरात (जि.नाशिक) या महामार्गाच्या कामात झालेली अनियमितता

**(२२) * ५२६२१ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौंदाणे कळवण,बोरगाव, सुरगाणा, उंबरठाण (ता.सुरगाणा, जि.नाशिक) ते गुजरात राज्य हद्द रामा २२ कि.मी. ९०/७५० रस्त्यावरील पूलाच्या दुरुस्तीच्या कामात अनियमितता झाली असून सदरचे काम बंद असल्याचे माहे जुन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाच्या कामाचा कार्यारंभ आदेश प्राप्त नसतांना तसेच कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची परवानगी न घेताच मक्तेदार एजन्सीने काम सुरु केले परंतु अद्याप पुर्ण केले नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडे दिनांक २५ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलाचे काम अर्धवट स्थितीत मक्तेदार एजन्सीने सोडून दिल्याने ग्रामस्थांना सुरगाणा गावाकडे जा-ये करण्यास गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर पुलाच्या दुरुस्तीच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ७ मार्च, २०१९ ला देण्यात आले आहेत. सदर कामात अस्तित्वातील पुलाचा स्लॅब तोडून नविन स्लॅब करणे, अंत्यपाद व मध्यपाद यांची दुरुस्ती करणे इ. बाबी समाविष्ट होत्या. स्लॅब तोडण्याचे काम सुरु असतांना अंत्यपाद व मध्यपादाचा भाग क्षतीग्रस्त झाला. त्यामुळे सद्यस्थितीत सदरचे काम बंद आहे.

(२) सदर विषयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे.

(३) राज्य मार्ग-२२ बाह्य वळण, हा पर्यायी रस्ता वाहतूकी करिता उपलब्ध आहे.

(४) अंत्यपाद व मध्यपाद नविन बांधकामास मंजूरी प्राप्त आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण करुन लवकरच काम सुरु करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोंडी (जि.सोलापूर) येथील एका खाजगी शिक्षण संस्थेला शाळेचा युडायस क्रमांक देण्याकरीता लाच घेताना** शिक्षणाधिकारी **यांना पकडल्याबाबत**

**(२३) * ५४९३७ श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी येथील एका खाजगी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षाकडून शाळेचा युडायस क्रमांक देण्यासाठी पंचवीस हजाराची लाच घेताना जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचवी ते आठवीचे वर्ग वाढविण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाकडून ऑनलाईन युडायस क्रमांक असणे आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित अधिकारी यांना शासन आदेश दि.७.११.२०२२ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गुमगांव ते वेणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे असल्याबाबत**

**(२४) * ५५०१६ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुमगांव ते वेणा (ता.हिंगणा, जि.नागपूर) नदीवर १० कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे व अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग-३ व उपविभाग-२ द्वारा कारवाई करण्याऐवजी दुरुस्ती करुन प्रकरण लपविण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुलाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत तसेच संबंधित कंत्राटदारावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) पूल व जोडरस्त्याचे काम माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असून पुलावरुन वाहतुक सुरु आहे. सदर कामातील इतर संकीर्ण बाबी प्रगतीत आहेत.

-----------------

**मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळण्याबाबत**

**(२५) * ४९८३८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना शासनाकडून ५० टक्के तर महापालिकेकडून ५० टक्के अनुदान देण्याचा निर्णय झालेला असताना या शाळांना अनुदान मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या शाळांमधील सुमारे ५०० पेक्षा अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना अद्याप अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तातडीने अनुदान वितरित करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे

(२) हे खरे नाही

(३) शासन पत्र दिनांक १३ जानेवारी,२००४ द्वारे सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राहय धरले जाणार नसल्याचे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे. तसेच तद्नंतर दिनांक २२ मार्च, २०१७ व दिनांक १० जुलै, २०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविले आहे.

(४) व (५) या प्रकरणी शासन स्तरावरुन फेरतपासणी करण्यात येत आहे.

-----------------

**तळेगाव-चाकण (जि.पुणे) एमआयडीसीमधील अवैध गॅस सिलिंडरचे रिफिलिंग होत असल्याबाबत**

**(२६) * ५२५६९ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव -चाकण (जि.पुणे) रस्त्यावरील महाळुंगे इंगळे येथील नागरी वस्तीत मध्यवर्ती ठिकाणी गॅस गळती होऊन एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यातील तळेगाव एमआयडीसीमधील नवलाख उंबरे तसेच चाकण एमआयडीसीमधील शिंदे, वासूली, भांबोली, आंबेठाण, सावरदरी, खालुंबरे, निघोज, नाणेकरवाडी येथे मिनी एलपीजी सिलिंडरची अवैधरित्या रिफिलिंग आणि काळयाबाजारात विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरवठा विभागातील अधिकारी व गॅस वितरक यांचे संगनमत असल्याने याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे दुर्घटना होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर अवैध आणि धोकादायकरित्या गॅस सिलिंडर रिफिलिंग कामगार व काळयाबाजारात विक्री करणाऱ्या संबंधितांवर तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

याबाबत संबंधितांवर महाळुंगे, ता.खेड पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.१६७३/२०२२ नुसार एफ.आय.आर.दाखल केलेला आहे.

(२) हे खरे आहे. अशी बाब निदर्शनास आल्यामुळे मौजे नानेकरवाडी, ता.खेड येथील अवैध रिफिलिंग व विक्री करणाऱ्या ज्ञानेश गॅस सर्विस व जाधव गॅस सर्विस या दोन दुकानांवर चाकण पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.२८९/२०२१ दाखल केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चर्चगेट मुंबई येथील मातोश्री हॉस्टेलमध्ये राजकीय कार्यकर्ते व माजी विद्यार्थी वास्तव्यास असल्याबाबत

**(२७) * ४९८२३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी मुंबईत येणा-या विद्यार्थ्याची राहण्याची सोय व्हावी याकरिता चर्चगेट, मुंबई येथे बांधलेल्या मातोश्री हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्याऐवजी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि शासकिय अधिकारी वास्तव्यास असल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गरजू विद्यार्थ्याऐवजी या सुविधेचा लाभ अन्य व्यक्तींकडूनच घेतला जात असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वसतिगृहाच्या अभ्यागत कक्षामध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून तसेच, सत्र कालावधी संपल्यानंतरही वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थ्यांना सूचना देऊन खोल्या रिक्त करून घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२८) * ५३६७० श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) शहरातील चार ते पाच व्यापारी रेशनचे धान्य अवैधरित्या खरेदी करुन ते कृष्णूर एमआयडीसी मधील कंपन्यांना देत असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कंपनी धान्यावर प्रक्रिया करून ते धान्य इतर राज्यात विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, अखिल महाराष्ट्र कामगार-कर्मचारी संघाने दि. १९ सप्टेंबर, २०२२ रोजी तहसिलदार नायगाव खै. यांचे कार्यालयात कृष्णूर एमआयडीसी मधील राईस मिल मध्ये राशनचा तांदूळ खरेदी करण्यात येत असल्या प्रकरणी चौकशी करून दोषीवर कार्यवाही करण्याबाबत अर्ज सादर केला होता.

सदर प्रकरणाच्या चौकशीमध्ये तक्रारीत काहीही तथ्य नसल्याचे आढळून आल्याने त्याबाबत तक्रारदार यांना कळवून त्यांचा अर्ज तहसिल कार्यालय, नायगाव खै. स्तरावरून निकाली काढण्यात आला आहे.

तसेच, संबंधित तक्रारदार यांनी दि.३०.०९.२०२२ रोजी जिल्हा पुरवठा कार्यालय, नांदेड येथे लेखी कळवून त्यांचे उपोषण मागे घेत असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर-औंढा (जि.परभणी) महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) * ५०१९७ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातून जाणाऱ्या जिंतूर-औंढा महामार्गाची दुरवस्था झाल्यामुळे माहे जुलै-ऑगस्ट, २०२२ या कालावधीत अपघात होऊन ४ व्यक्तींचा मृत्यू तसेच १८ जण गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात नागरीकांनी संबंधित विभागाकडे निवेदने देऊन आंदोलन करुनही त्याकडे संबंधित महानगर प्राधिकरणाचे दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे भरण्याचे काम पुर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील धारावी व अन्यत्र होणारी दुध भेसळ रोखण्याबाबत

**(३०) * ५३९०५ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई शहर) येथे गोकुळ व अन्य नामांकित दुध उत्पादक / वितरक कंपन्यांच्या दुधाच्या पिशव्यांमध्ये अशुध्द पाणी मिसळून भेसळयुक्त दुधाची विक्री करणाऱ्या सहा जणांना माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२२ मध्ये व त्या दरम्यान अटक करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धारावी, मुंबई तसेच राज्यभरात इतरत्र दुध तसेच अन्य दुग्धजन्य पदार्थांची भेसळ करून त्यांची सरार्सपणे विक्री होत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास व जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुसार भेसळींच्या प्रकारांना आळा घालून यासंदर्भातील कायद्यातील तरतूदी अधिक कठोर करुन संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) धारावी, मुंबई तसेच राज्यभरात इतरत्र दुध तसेच अन्य दुग्धजन्य पदार्थांची भेसळ करून त्यांची सर्रासपणे विक्री होत नाही. ज्या-ज्या ठिकाणी अशी भेसळ करत असल्याचे आढळून येते, त्या-त्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनामार्फत कायदेशीर कारवाया करण्यात येतात.
(३) यासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली असून, धारावी (मुंबई शहर) येथील कारवाईप्रकरणी गुन्हे शाखा नियंत्रण आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांनी शाहू नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे व ०६ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

राज्यात माहे एप्रिल २०२२ पासून नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत एकूण दुग्धजन्य पदार्थांचे १८६८ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले आहेत. ज्यापैकी ८२० नमुने प्रमाणित, ७६ कमी दर्जाचे, २९ असुरक्षित, १७ मिथ्याछाप घोषित केले आहेत. ९२६ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. तसेच २ प्रकरणात FIR नोंदविले आहेत व २ आरोपी अटकेत आहेत. राज्यात एकूण २८२९१ किलो दुग्धजन्य पदार्थाचा साठा जप्त केला असून त्याची किंमत रूपये ८३,२४,६०६/- इतकी आहे. एकूण २३ प्रकरणात न्यायनिर्णय दाखल केले आहेत व १ प्रकरणात खटला दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास आयुक्तालय (नाशिक) येथील बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडून शासकीय आश्रमशाळेचे काम मिळवून देतांना होत असलेल्या अनियमततेबाबत

**(३१) * ५२५७० श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयातील बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता यांनी शासकीय आश्रमशाळेतील सेंट्रल किचनच्या निविदा प्रक्रियेत काम मिळवून देण्यासाठी २८ लक्ष ८० हजार इतक्या रकमेची लाच मागितल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी देखील आश्रमशाळा इमारत बांधकाम, दुरुस्तीची कामे, सुशिक्षित बेरोजगार अभियंता नोंदणीच्या कामातही मोठ्या प्रमाणात लाच घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याची मागणी आयुक्त आदिवासी विकास, प्रकल्प अधिकारी कळवण, नाशिक यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) लाचेचा सापळा प्रकरणात संबंधित कार्यकारी अभियंता यांचे दि.२६.०८.२०२२ पासून निलंबन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत शिक्षक भरती प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(३२) * ५५०२३ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत १२८ कंत्राटी शिक्षक भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, फाईन आर्ट (ड्रामा) या विषयाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी तत्वावरील एक अध्यापिका सदर पदासाठी अपात्र असल्याची तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली होती.

(२) सदर तक्रारीची चौकशी उप सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) व सहसंचालक, नागपूर यांच्या संयुक्त समितीने केली. त्यानुसार "या प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे पुनश्च: पडताळणी करून योग्य तो निर्णय घ्यावा" असे विद्यापीठास कळविण्यात आले. त्यानुसार विद्यापीठाने सदर नियुक्तीची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार पडताळणी केली. पडताळणीअंती सदर अध्यापिका कंत्राटी पदावर नियुक्तीसाठी पात्र असल्याचे दिसून आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.